**वाचा** :- १)म.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडील ज्ञापन आरोग्य/अस्था४/९८६/१६ दि.१४/७/२०१६
२) म.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडील नेमणुक आदेश क्रमांक आरोग्य /अस्था४/ ११००/१६ दि.२९/१०/२०१६
३) सहाय्यक आयुक्त (चौकशी),नाशिक विभाग नाशिक यांचेकडील पत्र क्र.विशा-४/खाचौ/सीआर-२५४/२०१७ दि.१२/७/२०१७
४) या कार्यालयाची अंतिम कारणे दाखवा नोंक्षि क्रमांक आरोग्य/अस्था४/४४०/१७ दि.२५/९/२०१७
५) श्री.भामरे, आरोग्य सेवक यांचा अं.का.दा.नोंक्षिस खुलासा दि.९/१०/२०१७
६) या कार्यालयाची मंजुर टिपणी दिनांक :- २६ / १० /२०१७

---

**नाशिक जिल्हा परिषद, नाशिक**
जा.क्र.आरोग्य/अस्था४/९६९/२०१७
नाशिक दिनांक: २६/ १० /२०१७

**आदेश**

श्री.पी.एस.भामरे, आरोग्य सेवक प्रा.आ.केंद्र वावी येथे हजर होणेकरीता गेले असता मदयप्राशन करणे तसेच त्यांनी शासकीय कामकाजात अडथळा आणुन कर्तव्यात अक्षम्य कसुर केल्याचे निदर्शनास आल्याने तसेच दि.०१/१०/२०१५ ते दि.१०/७/२०१७ पावेतो कामी अनधिकृत गैरहजर असल्याने ज्ञापन क्र.आरोग्य/अस्था४/९८६/१६ दि.१४/७/२०१६ अन्वये खालीलप्रमाणे खातेचौकशी सुरु करण्यात आली.

१) मदयप्राशन करणे तसेच शासकीय कामकाजात अडथळा आणुन असभ्य वर्तन करणे
२) कामी दि.०१/०२/२०१५ ते दि.१०/७/२०१७ अनधिकृत गैरहजर राहणे.
३) अनधिकृत रित्या गैरहजर राहुन श्री.भामरे,आ.सेवक यांनी आदीवासी भागातील जनतेस आरोग्य सेवेपासुन वंचीत ठेवणे.

प्रस्तुत ज्ञापन व परिशिष्ट १ ते ४ हे श्री.पी.एस.भामरे,आरोग्य सेवक (पु) यांना बजाविणेत आल्याने विहीत मुदतीत खुलासा सादर केलेला नसल्याने प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्रजिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील)नियम १९६४ चा नियम ६ (३) नुसार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नाशिक यांचे कडील आदेश क्र आरोग्य/अस्था४/११००/२०१६ दि.२९/१०/२०१६ अन्वये सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग नाशिक यांची नेमणुक करणेत आलेली होती.

सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग नाशिक यांचेकडील पत्र क्र. पत्र क्र.विशा-४/खाचौ/सीआर-२५४/२१७ दि.१२/७/२०१७ अन्वये चौकशी अहवाल प्राप्त झाला आहे. चौकशी अहवालात नमुद केलेनुसार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नाशिक यांचेकडील अंतिम कारणे दाखवा नोंक्षि आरोग्य/अस्था४/४४०/२०१७ दि.२५/९/२०१७ अन्वये श्री.पी.एस.भामरे,आरोग्य सेवक (पु) यांना महाराष्ट्रजिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ भाग तीन - चे नियम ४ (६) नुसार **जिल्हा परिषद नाशिक सेवेतुन कमी करणेची कारवाई का येुव नये? तसेच दि.१/१०/२०१५ ते दि.१०/७/२०१७ या अनधिकृत गैरहजेरीचा कालावधी असाधारण रजा (विनावेतन) का करणेत येवु नये याबाबत विचारणा करण्यात येवुन दि.९/१०/२०१७ रोजी खुलासा मागविणेत आला होता.**

प्रस्तुत अंतिम कारणे दाखवा नोंक्षीचे आदेशास श्री.पी.एस.भामरे आरोग्य सेवक (पु) यांनी खुलासा दि.९/१०/२०१७ रोजी सादर केलेला आहे. सदर खुलाशात नमुद केलेनुसार आर्थिक ,मानसिक,व कौंक्षिक कुचंबना झाल्याने ते कामी हजर राहु शकले नाही.त्यांनी खुलाशात नमुद केलेले आहे की, त्यांची मनस्थिति चांगली झालेली असल्याने त्यांना एक वेळेस क्षमा करावी व अं.का.दा.नोंक्षीत शिक्षा नमुद केलेप्रमाणे सेवेतुन कमी करु नये अशी विनंती केलेली आहे.तरी सर्व परिस्थिती विचारात घेता सदर प्रकरणी नियुक्ती प्राधिकारी या नात्याने मी.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नाशिक **महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे भाग-तीन कलम ४( 2 ) नुसार प्राप्त अधिकाराचा वापर करुन श्री.पी.एस.भामरे आरोग्य सेवक यांना** मुळ पदाचे मुळ वेतनावर आणणेची शिक्षा देत आहे. तसेच दि. १/१०/२०१५ ते दि. १०/७/२०१७ या अन. गैर. कालावधी (विनावेतन) असाधारण (रजा) धरणेत येत आहे. प्रस्तुत आदेशाची नोंद श्री.पी.एस.भामरे,आरोग्य सेवक (पु) याचे मुळसेवापुस्तकात घेण्यात यावी.

(दीपक कुमार मीना)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद नाशिक

प्रति,

**श्री.पी.एस.भामरे, आरोग्य सेवक (पु),प्रा.अ.केंद्र वावी ता.सिन्नर**
**हल्लीचे कार्यालय प्रा.आ.केंद्र अंदरसुल, उपकेंद्र भुलेगाव,ता.येवला**
**व्दारा:- गटविकास अधिकारी पंचायत समिती येवला**

**प्रत:- गटविकास अधिकारी ,पंचायत समिती सिन्नर**
**प्रत:- गटविकास अधिकारी पंचायत समिती येवला**

२/- समवेत आदेशाच्या ३ प्रती जोडलेल्या असुन त्यापैकी १ प्रत श्री.भामरे ,आरोग्य सेवक (पु) यांना बजावून दुसऱ्या प्रतीवर दिनांकित स्वाक्षरी घेऊन सदरची प्रत इकडेस सादर करावी.

**प्रत:- अस्थापना विभाग -४ आरोग्य विभाग जि.प.नाशिक**

(दीपक कुमार मीना)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद नाशिक**